05-04-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/04/2025 10:00 PM Page 1



## निवडक

### काणकोण येथील गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठात ६रोजी रामनवमी

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ४** : पर्तगाळ, काणकोण येथील श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाला ५५० वर्षे पूर्ण होत आहेत. चा सार्ध पंचशताब्दी वर्षपूर्ती महोत्सवानिमित्त यंदा पर्तगाळी काणकोण येथील केंद्रीय मठांत विस्तारीत बांधकाम चालू आहे. तसेंच सौंदर्यिकरणाचें काम चालू आहे. त्यामुळे यंदा रामनवमी उत्सव दि. ६ रोजी असून मठाचें व परिसरात बांधकाम चालू असल्याने रामनवमी उत्सव साधेपणाने साजरा करण्याचा निर्णय परम पूज्य श्री स्वामी महाराजांनी घेतला आहे. त्यादिवशी रामजन्माच्या धार्मिक विधी तेवढ्या साधेपणाने केल्या जातील. बांधकामामुळे लोकांना व भावीकांना अडचणीचे होऊ नये, म्हणून श्रीस्वामी महाराजांच्या आदेशाप्रमाणे मठानुयायी, भाविक व भक्तांनी घरींच प्रभू रामचंद्राची उपासना करावी. जेथे रामनाम तारक मंत्र अभियान चालू आहे तेथे सहभागी होऊन रामनामाचा जप करावा. श्री हरि गुरू कृपेस पात्र व्हावे, असे श्री मठ कमिटीतर्फे कळविण्यात आले आहे.

---

### राष्ट्रोळी साई मंदिर ट्रस्टच्या वर्धापनदिननिमित्त कार्यक्रमांना सुरुवात

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. ४** : श्री राष्ट्रोळी साई मंदिर ट्रस्ट सांगोल्डा यांचा २५ वा वर्धापन दिन सोहळा शुक्रवार दि. ४ ते ११ पर्यंत कार्यक्रमांविषयी साजरा होणार आहे शुक्रवार ४ रोजी विविध धार्मिक कार्यक्रमाने सांगता करण्यात आली.

रविवार दि. ६ रोजी संध्याकाळी सात वाजता आरती नंतर नाटक मावशी आमका खावशी सोमवार दि. ७ रोजी संध्याकाळी ७ वाजता आरती नंतर रात्री आठ वाजता ऑर्केस्ट्रा सेवन कलर्स मंगळवार दि. ८ रोजी संध्याकाळी सात वाजता आरती नंतर ८ वाजता गायनाचा कार्यक्रम गायक शुभम नाईक यांचा बहार कार्यक्रम होईल. बुधवार दि. ९ रोजी सकाळी सहा वाजता नित्य महापूजा साडेआठ वाजता आरती मूर्तीचे व पादुकांचे तेजो तारण दुपारी श्रींची महाआरती, महाप्रसाद संध्याकाळी दीपोत्सव तसेच आरती नंतर रात्री आठ वाजता भजनाचा कार्यक्रम भजन संध्या यात पांडुरंग राऊळ, प्रल्हाद गावस विठ्ठल शिरोडकर त्यांना तबला साथ निशिकांत कळंगुटकर पखवाज प्रसाद कलंगुटकर हार्मोनियम विलास शेट्ये करणार आहेत कार्यक्रमाचे यजमान जानवी चंदन केरकर राजश्री राजेंद्र केरकर, नीता धर्मो कांदोळकर शामल शामसुंदर सोमनी ,सिंचन प्रेमानंद कोचरेकर गुरुवार दि. १० रोजी सकाळ ७ वाजता धार्मिक विधी त्यानंतर साडेआठ वाजता पुनर्प्रती स्थापना साईदत्त प्रारंभ आरती महाप्रसाद दुपारी ३.३० वाजता पालखी मिरवणूक शुक्रवार दि. ११ संध्याकाळी ७ वाजता आरती रात्री साडेसात वाजता दीपोत्सव नंतर फुगडी कार्यक्रम होणार आहे

---

### राज्यस्तरीय शिमगोत्सवात आरोही वेरेकर प्रथम



■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. ४** : सावईवेरे येथील आरोही वेरेकर ही राज्यस्तरीय शिमगोत्सवात सहभागी होऊन एकूण पाच ठिकाणी प्रथम बक्षिसांची मानकरी ठरल्याने तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. आरोही ही दरवर्षी राज्यस्तरीय शिमगोत्सवात भाग घेत उत्कृष्ट वेशभुषेसह उत्तम भूमिका साकारत आहे. यंदा तिने विष्णू अवताराची वेशभूषा साकारत फोंडा, शिरोडा, डिचोली, कलंगुट व कुंकळ्ळे याठिकाणी प्रथम बक्षीस पटकावले आहे.तर साखळी येथे तिला सहावे बक्षीस मिळाले. याच दरम्यान वळवई येथे शिवजयंती उत्सवानिमित्त संभाजीची उत्तम वेशभूषा साकारत प्रथम बक्षीस पटकावले आहे.तिला अभिनयाची खूपच आवड असल्याने तिने आजपर्यंत राज्यस्तरीय व तालुका स्तरीय वेशभूषा स्पर्धांत भाग घेऊन विविध भूमिका साकारली आहे व आपल्या उत्तम अभिनयाच्या जोरावर असंख्य बक्षिसे पटकावली आहेत.

---

### हरमल येथे उद्या 'संगीत ययाति आणि देवयानी' नाटक

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ४** : रामनवमी उत्सवनिम्मित दरवर्षीप्रमाणे कामाक्षी नाट्यवृंदतर्फे रविवार दि. ६ रोजी रात्री १० वाजता महेश पै दिग्दर्शित 'संगीत ययाति आणि देवयानी' नाटक, देऊळवाडा श्री देव रवळनाथ मंदिर प्रांगणात होणार आहे.या नाटकाचे सहाय्यक दिग्दर्शन सुरेश पै, विश्वेश पै, सहाय्यक सकोजी नाईक, रोशन गुरु नानोस्कर,राजू बर्वे (हार्मोनियम)देवेंद्र केपकर (तबला)रंगमंच व्यवस्था म्हाळसा देवी नाट्यलंकार यांची आहे. या नाटकात काशिनाथ पै, नंदू पै, वैभव पै, दिलीप म्हामल, शौनक पै, भिकाजी नानोस्कर, तुकाराम ठाकूर, सिद्धी सोमनाथ पार्सेकर व सिद्धी प्रभू चोडणेकर यांच्या भूमिका आहेत. तरी भाविकांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

---

### न्हावेली साखळी येथे उद्या 'संगीत राजा रुक्मांगद' नाटक



■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ४** : न्हावेली साखळी येथील श्री देव रवळनाथ देवस्थानात रविवार दि. ६ रोजी रामनवमीनिमित्त दुपारी ३ वाजता सत्यनारायण महापूजा, ४ वाजता हरिपाठ व दिंडी,संध्याकाळी ६ वाजता स्थानिक कलाकारांचा भजनाचा कार्यक्रम, रात्री ८ वाजता फळांची पावणी व १० वाजता श्री रवळनाथ भजनी मंडळातर्फे वासुदेव गुणाजी मांद्रेकर लिखित तीन अंकी पौराणिक नाटक 'संगीत राजा रुक्मांगद' सादर करण्यात येणार आहे.

यात प्रितेश गावस, लवू गावस, केतन गावस, संजू गावस, नीलेश गावस, प्रवीण गावस, नीलेश गावस, सुंदर उर्फ अजय गावस, साहिल गावस,आदर्श गावस, देवांश गावस, सोनिया शेट्ये, रुतवा गावस हे कलाकार भाग घेणार असून नाटकाचे दिग्दर्शन जितेंद्र गावस यांनी केले आहे. निर्माता रूपेश ज. गावस असून तबल्यावर पं.तुळशीदास नावेलकर, संगीत दिग्दर्शक महेश गावस, पार्श्वसंगीत विनय गावस यांचे आहे. विशेष सहाय्यक सुनिल गावस व राजू गावस यांचे आहे. तरी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री रवळनाथ भजनी मंडळातर्फे कळविण्यात आले आहे.

---

### वडावल येथे आज 'घर माझे देवघर'

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. ४** : लाटंबार्से पंचायत क्षेत्रातील वडावल हरिजनवाडा येथे शनिवार दि. ५ एप्रिल रोजी श्री राष्ट्रोळी देवाच्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी यजमानाचे देह शुद्धीकरण त्यानंतर यज्ञ होम, आरती, तीर्थप्रसाद होणार आहे. रात्री ९ वाजता रमाकांत शं. पायाची लिखित अर्जुन वडावलकर दिग्दर्शित तीन अंकी सामाजिक संगीत नाटक 'घर माझे देवघर' सादर करण्यात येणार आहे. या नाट्यप्रयोगात महेश वडावलकर, तुळशीदास वडावलकर, सज्ञन वडावलकर, रामा पार्सेकर, तुळशीदास साळसकर, साबाजी वडावलकर, दीपक वडावलकर, लक्ष्मण वडावलकर आणि ममता जाधव आदी भुमिका साकारणार आहेत. या नाट्यप्रयोगाचे संगीत दिग्दर्शक गोपाळ वडावलकर, तबला साथ विशाल कांबळे यांची तर सह दिग्दर्शक विजय पार्सेकर असून नेपथ्य, प्रकाश योजना, ध्वनी संयोजन – गुरुप्रसाद रंगमंच – कासारपाल यांची आहे.

---

# तपासात विलंब केल्यास पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई

## वेळेवर तपास व खटला चालवणे अत्यंत महत्त्वाचे : अधिक जबाबदारीने तपास होणे गरजेचे

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ४** : फौजदारी न्यायव्यवस्थेत व्यापक सुधारणा घडवून आणण्याच्या दिशेने सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता आरोपपत्र दाखल करण्यास झालेल्या विलंबासाठी संबंधित तपास अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली जाणार आहे. हा निर्णय भारतीय न्याय संहिता आणि नव्या गुन्हेगारी कायद्यांतर्गत अनिवार्य करण्यात आलेल्या मानक कार्यपद्धती (एसओपी) लागू करण्याचा एक भाग आहे.

मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी पर्वरी येथे पत्रकार परिषदेत सांगितले की, न्याय प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी जबाबदारी निश्चित करणे, डिजिटल परिवर्तन आणि फॉरेन्सिक साहाय्य वाढवणे यावर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

आरोपपत्र दाखल करण्यास विलंब झाल्यास संबंधित पोलिस अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित केली जाईल. वेळेवर तपास व खटला चालवणे अत्यंत महत्त्वाचे आहे, विशेषतः संघटित गुन्हेगारी, मॉब लिंचिंग आणि दहशतवादाशी संबंधित प्रकरणांमध्ये, अधिक जबाबदारीने तपास होणे गरजेचे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.तपास प्रक्रियेत सातत्य राखण्यासाठी सरकारने संघटित गुन्हेगारी हाताळण्यासाठी एकसमान मानक कार्यपद्धती (एसओपी) जारी केली आहे. राज्यातील सर्व पोलिस ठाण्यांना या एसओपीचे पालन करावे लागेल,असे मुख्यमंत्री म्हणाले.

नव्या कायदेशीर चौकटी अंतर्गत पोलिस, गृह, कायदा आणि अभियोजन विभागाच्या अधिकाऱ्यांना १००% प्रशिक्षण देण्यावर सरकारचा भर आहे. न्यायप्रक्रिया अधिक प्रभावी करण्यासाठी डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण केल्या जात आहेत.

ई-समन्स प्रणाली आधीच कार्यान्वित करण्यात आली असून, लवकरच ई-पोस्टमॉर्टेम अहवालांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध होतील. यामुळे वैद्यकीय अहवाल थेट रुग्णालयांमधून पोलिस ठाण्यांमध्ये इलेक्ट्रॉनिक स्वरूपात मिळू शकतील. आम्ही या प्रक्रियेमध्ये १००% अनुपालन सुनिश्चित करत आहोत, असे मुख्यमंत्री म्हणाले. राज्यातील न्यायालये, तुरुंग, पोलिस ठाणे, जिल्हाधिकारी कार्यालये आणि अभियोजन विभागांमध्ये व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) सुविधा मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आल्या आहेत. पूर्वी १३ ठिकाणी व्हीसी सुविधा होत्या, आता ती संख्या ५३ पर्यंत वाढवण्यात आली आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

गुन्हेगारी तपास अधिक जलद आणि अचूक करण्यासाठी मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन्स तैनात करण्यात आल्या आहेत. भारत सरकारने दोन आणि राज्य सरकारने एक अशा तीन व्हॅन्स जारी केल्या आहेत. या वाहने अपघात आणि गुन्ह्यांच्या तपासासाठी वापरल्या जात आहेत, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

सावंत यांनी फॉरेन्सिक तपासातील तफावतींबद्दल चिंता व्यक्त केली. सात वर्षांपेक्षा अधिक शिक्षा असलेल्या प्रकरणांपैकी १,८९९ एफआयआर दाखल झाले असले तरी फक्त ३७० प्रकरणांमध्ये फॉरेन्सिक तपास करण्यात आला आहे. यामध्ये सुधारणा करण्यासाठी १००% फॉरेन्सिक भेटी अनिवार्य करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे,असे त्यांनी सांगितले. गुन्हेगारी तपासादरम्यान जप्त करण्यात आलेली मालमत्ता योग्य मालकांना परत करण्यासाठी सरकार विशेष योजना आखत आहे. गुन्हेगारांकडून जप्त झालेली जमीन आणि इतर मालमत्ता मूळ मालकांना परत करण्यासाठी कायदेशीरदृष्ट्या सुदृढ यंत्रणा निर्माण केली जाईल. यासाठी आवश्यक नियम, अधिसूचना आणि प्रशासकीय आदेशांची अंमलबजावणी केली जात आहे, असे सावंत यांनी स्पष्ट केले.

---

# मडगाव नगर परिषद शुल्कवाढीवर काँग्रेसचा तीव्र विरोध

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ४** : मडगाव नगर परिषदेने (एमएमसी) अलीकडेच केलेल्या शुल्कवाढीवर काँग्रेस गटाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी या शुल्कवाढीला अन्याय्य ठरवत, ती परिषदेच्या ठरावांचे उल्लंघन असल्याचा आरोप केला आहे. २ एप्रिलपासून लागू झालेल्या या निर्णयामुळे नागरिकांमध्ये तसेच राजकीय वर्तुळातही तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

काँग्रेस प्रतिनिधींनी या वाढीव शुल्कवाढीला अतार्किक व अन्याय्य ठरवून ती त्वरित मागे घेण्याची मागणी केली आहे. पत्रकार परिषदेत काँग्रेस नेत्यांनी सत्ताधारी नगर परिषद, स्थानिक राजकीय नेते आणि विद्यमान नगरसेवकांवर आरोप करत सांगितले की, या निर्णयामुळे मडगावकरांवर अनावश्यक आर्थिक बोजा टाकला जात आहे.

या शुल्कवाढीच्या निर्णयात पारदर्शकता नसल्याचा मुद्दा काँग्रेसने उपस्थित केला आहे. केवळ सत्ताधाऱ्यांच्या फायद्यासाठी हा निर्णय घेतला गेला असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. काँग्रेस नेते सॅव्हियो कुतिन्हो यांनी यासंदर्भात बोलताना सांगितले की, परिषद जबरदस्तीने ही शुल्कवाढ लादत आहे, जी पूर्णतः अन्यायकारक आहे. नगर परिषदेकडे शुल्क लावल्या जाणाऱ्या जागांची योग्य माहितीही नाही. त्यामुळे यामुळे अधिक गोंधळ निर्माण होईल.

काँग्रेस सदस्य दामोदर ओंसकर आणि क्लिफर्ड डायस यांनी नागरिकांना वाढीव शुल्क भरण्यास नकार देण्याचे आवाहन केले आहे. ही शुल्कवाढ मडगावच्या नागरिकांवर आर्थिक ओझे टाकणारी असून ती त्वरित मागे घेतली पाहिजे,असे त्यांनी स्पष्ट केले.

काँग्रेसने एमएमसीला आवाहन केले आहे की, शुल्कवाढीचा सखोल आढावा घेईपर्यंत ती स्थगित करण्यात यावी. पक्षाने मडगावच्या नागरिकांच्या हक्कांसाठी संघर्ष करण्याचा निर्धार केला असून, स्थानिक प्रशासनाला जबाबदार धरले जाईल, असा इशाराही दिला आहे.

दरम्यान, मडगावचे आमदार दिगंबर कामत यांनी आरोप फेटाळून लावत सांगितले की, मडगाव नगरपरिषदेने मोठ्या प्रमाणावर करवाढ केल्याचा प्रचार खोटा आहे. मडगावचे नागरिक शुल्क भरण्यास तयार आहेत, मात्र त्यांना नगरपालिका प्रशासनाकडून चांगल्या सेवा अपेक्षित आहेत, असे कामत म्हणाले.

२ एप्रिलपासून लागू झालेल्या शुल्कवाढीवर बोलताना आमदार कामत म्हणाले की, महानगरपालिका प्रशासन योग्य महसूल गोळा करत नसेल, तर कर्मचाऱ्यांचे पगार कसे दिले जातील? एमएमसीने इतर नागरी संस्थांच्या तुलनेत तुलनात्मकदृष्ट्या कमी शुल्कवाढ केली आहे.

मडगाव नगराध्यक्ष दामोदर शिरोडकर यांनीही स्पष्ट केले की, एमएमसीने कोणतेही कर वाढवलेले नाहीत. फक्त व्यापार परवाना शुल्क आणि काही सेवांचे शुल्क तर्कसंगत केले आहे.नगरपालिकेने घेतलेल्या या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर नागरिक आणि राजकीय वर्तुळात मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू आहे. शुल्कवाढीचा आढावा घेतल्यानंतर पुढील निर्णय होईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

---

# म्हादई प्रवाह समितीची २२ एप्रिलला बैठक

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ४** : कर्नाटकच्या कळसा नाला प्रकल्पाच्या संयुक्त स्थळ तपासणीसंदर्भात गोवा सरकारने दिलेल्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी प्रोग्रेसिव्ह रिव्हर अथॉरिटी फॉर वेल्फेअर अँड हार्मनी (प्रवाह)ची बैठक २२ एप्रिल रोजी बेंगळुरू येथे होणार आहे.

ही प्रवाह समितीची चौथी बैठक असून, यापूर्वी ४ मार्च रोजी मुंबईत नियोजित होती. मात्र, ती पुढे ढकलण्यात आली होती. समितीची तिसरी बैठक २५ ऑक्टोबर २०२३ रोजी गोव्यात झाली होती. त्यावेळी अध्यक्ष नवीन कुमार यांच्या नेतृत्वाखाली प्राधिकरणाने संयुक्त स्थळ तपासणीच्या विनंतीसंदर्भात केंद्र सरकारकडून कायदेशीर मत घेण्याचा निर्णय घेतला होता.

यासोबतच, बैठकीत नवीन लघु सिंचन प्रकल्प आणि पिण्याच्या पाण्याच्या प्रकल्पांच्या अंतिम मंजुरीच्या प्रक्रियेवर सविस्तर चर्चा होणार आहे. तसेच, महाराष्ट्राच्या विर्डी मोठ्या लघु सिंचन प्रकल्पाच्या डीपीआरवरही सदस्य चर्चा करणार आहेत. या प्रकल्पाला कर्नाटकने आक्षेप घेतला आहे.

गेल्या वर्षी जुलै महिन्यात गोवा सरकारच्या विनंतीनुसार प्रवाह समितीने गोवा, कर्नाटक आणि महाराष्ट्रातील म्हादई खोऱ्यांची पाहणी केली होती. मात्र, प्रत्यक्ष वळवणीच्या ठिकाणाची तपासणी करण्यात समिती अपयशी ठरली होती.

या पार्श्वभूमीवर, गोवा सरकारने ऑगस्ट २०२३ मध्ये प्राधिकरणाला पुन्हा एकदा संयुक्त स्थळ तपासणीची विनंती केली होती. प्रवाह समितीची पहिली बैठक फेब्रुवारी २०२४ मध्ये गोव्यात, तर दुसरी बैठक जुलै २०२४ मध्ये बेंगळुरू येथे झाली होती.

---

# अधिकाऱ्यांचे टरबूज देऊन आभार

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ४ :** प्रभुनगर कुर्टी, बेतोडा आणि उसगाव गांजे येथे गेल्या अनेक महिन्यांपासून भेडसावत असलेल्या पाणीटंचाईच्या समस्येवर अखेर तोडगा निघाला आहे. महिलांनी वारंवार आंदोलने आणि तक्रारी केल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने जलपुरवठा पूर्ववत केला. समाधान व्यक्त करत स्थानिक महिलांनी विभागाच्या सहाय्यक अभियंता आणि कनिष्ठ अभियंत्यांचा टरबूज आणि स्मितहास्याने सत्कार केला. गेल्या महिनाभर उसगाव भागातील नागरिक पाण्यासाठी संघर्ष करत होते. उन्हाळ्यात वाढलेल्या उष्णतेमुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली होती. अखेर, सार्वजनिक बांधकाम विभागाने उपाययोजना करत वडबाग आणि तांबडीघाटी भागात जलपुरवठा सुरळीत केला. त्यामुळे महिलांनी समाधान व्यक्त करत अभियंत्यांचे आभार मानले.

गेल्या काही महिन्यांपासून वडबाग आणि तांबडीघाटी भागातील पाणीपुरवठा यंत्रणेत तांत्रिक बिघाड झाल्यामुळे नळ कोरडे पडले होते. यावर तोडगा काढण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पाणीपुरवठा शाखेने विशेष लक्ष दिले. कनिष्ठ अभियंता यशराज तळपी यांनी इतर कर्मचाऱ्यांसह जलवाहिन्यांचे निरीक्षण करून आवश्यक दुरुस्त्या केल्या, ज्यामुळे अखेर पाणीपुरवठा पूर्ववत होऊ शकला.

याप्रकरणी उसगाव गांजे पंचायत सदस्या मनीषा उसगावकर यांनी पुढाकार घेतला. काँग्रेस पक्षाच्या नेत्या आणि अन्य महिलांच्या सहकार्याने त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहाय्यक अभियंता काशीनाथ सराफ यांची भेट घेतली. महिलांनी रिकाम्या भांड्यांसह आंदोलन करत जलसंकट सोडवण्याची मागणी केली होती. यानंतर, अभियंता सराफ यांनी समस्येवर तातडीने तोडगा काढण्याचे आश्वासन दिले आणि ते प्रत्यक्षात उतरवले.

पाणीपुरवठा पूर्ववत झाल्यानंतर स्थानिकांनी अभियंत्यांचे अनोख्या पद्धतीने स्वागत केले गेले . समाधान व्यक्त करत महिलांनी सहाय्यक अभियंता काशीनाथ सराफ आणि त्यांच्या पथकाला टरबूज अर्पण केले. स्थानिकांनी विभागाच्या त्वरित प्रतिसादाबद्दल आभार मानले.

या संदर्भात पंचायत सदस्या मनीषा उसगावकर म्हणाल्या, पाण्याच्या समस्येबाबत आम्ही अनेक वेळा तक्रार केली होती. महिलांनी रिकाम्या भांड्यांसह आंदोलन केले, त्यानंतर अभियंता सराफ यांनी जलपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले. त्यांनी हे आश्वासन पूर्ण केले आणि आता नागरिकांना नियमित पाणी मिळत आहे.

---

# बेतालभाटी बीच कचऱ्याच्या विळख्यात

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ४** : सासष्टी तालुक्यातील बेतालभाटी समुद्रकिनारा, जो पर्यटक आणि स्थानिकांसाठी एक लोकप्रिय पिकनिक स्थळ आहे, सध्या मोठ्या प्रमाणावर कचऱ्याच्या विळख्यात सापडला आहे. प्लास्टिक, कागदी प्लेट्स, कप, अन्नाचा कचरा आणि अन्य टाकाऊ पदार्थांनी किनाऱ्याचा मोठा भाग व्यापला असून, त्याचा स्वच्छ व नयनरम्य देखावा धोक्यात आला आहे.

ही परिस्थिती ग्रामस्थांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तत्काळ बेतालभाटी ग्रामपंचायतीकडे तक्रार केली. मात्र, समुद्रकिनाऱ्याची स्वच्छता राखण्याची जबाबदारी स्थानिक पंचायतीची की पर्यटन विभागाची, यावर अद्याप स्पष्टता नाही.

किनाऱ्यावर योग्य कचरा विल्हेवाटीसाठी आवश्यक सुविधा नसल्यामुळे पर्यटकांना कचरा टाकण्यासाठी कोणतेही निश्चित स्थान उपलब्ध नाही. पर्यटन विभागाने नव्याने नियुक्त केलेल्या कंत्राटदाराने अद्याप कचराकुंड्या बसवल्या नसल्यामुळे समस्या अधिक गंभीर झाली आहे, असे ग्रामपंचायत सदस्यांनी सांगितले.

याशिवाय, समुद्रकिनाऱ्यावर स्वच्छतेसाठी नेमण्यात आलेले कामगार मर्यादित क्षेत्रातच काम करत असल्याचे निदर्शनास आले आहे. ते किनाऱ्याच्या काही भागांची स्वच्छता करत असले, तरी समुद्राच्या जवळच्या भागांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला आहे.

बेतालभाटी येथील स्थानिक रहिवासी फ्रँकलिन फर्नांडिस यांनी समुद्रकिनाऱ्याची दयनीय अवस्था पाहून नाराजी व्यक्त केली. या ठिकाणी येणारे पर्यटक जर असा अस्वच्छ किनारा पाहतील, तर ते पुन्हा येथे कधीच येणार नाहीत, असे त्यांनी सांगितले. ग्रामसभेच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत, पर्यटकांकडून स्वच्छतेबाबत अधिक जबाबदारी घेतली जावी, यासाठी सुरक्षारक्षक तैनात करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. मात्र, हा उपाय अद्याप अंमलात आलेला नाही.

उपसरपंच इल्मा डायस यांनी सांगितले की, पंचायतीने समुद्रकिनारा स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. मात्र, आठवड्याच्या शेवटी पर्यटकांची मोठी गर्दी असल्याने परिस्थिती नियंत्रणात ठेवणे कठीण होत आहे. यावर उपाय म्हणून, पर्यटकांकडून स्वच्छता शुल्क आकारण्याचा प्रस्ताव ग्रामपंचायतीने समोर ठेवला आहे. या शुल्कातून किनाऱ्याच्या स्वच्छतेसाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना आणि कचरा व्यवस्थापनासाठी निधी उभारला जाणार आहे.

ग्रामपंचायतीने या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. यामध्ये समुद्रकिनाऱ्यावर कचरा टाकण्यासाठी आवश्यक सुविधा पुरवणे , स्वच्छता निरीक्षणासाठी स्थानिक सुरक्षा कर्मचारी तैनात करणे , कचरा संकलनासाठी अधिक कार्यक्षम यंत्रणा विकसित करणे , समुद्रकिनाऱ्याची नियमित स्वच्छता सुनिश्चित करणे इत्यादी उपाययोजनांचा समावेश आहे.

बेतालभाटी समुद्रकिनाऱ्यावर वाढत्या कचऱ्यामुळे पर्यटक आणि स्थानिक रहिवासी दोघेही अस्वस्थ आहेत. प्रशासनाने त्वरित उपाययोजना केल्या नाहीत, तर या पर्यटन स्थळाची प्रतिमा मलीन होण्याचा धोका आहे.

---

# 'ह्यूजेस प्रिसिजन' विरोधात ग्रामस्थांचे तीव्र आंदोलन

■ टीम दैनिक हेराल्ड




**मडगाव, दि. ४** : स्थानिक प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे संतप्त झालेल्या दक्षिण गोव्यातील नाकेरी – बेटतुल पंचायतीच्या नागरिकांनी शुक्रवारी दक्षिण गोवा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने केली. ह्यूजेस प्रिसिजन मॅन्युफॅक्चरिंग प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या विरोधात आंदोलन करत त्यांनी तात्काळ कारवाईची मागणी केली. ग्रामस्थांच्या मते, कंपनीच्या कारभारामुळे स्थानिक रहिवाशांच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी प्रशासनाला सात दिवसांचा अल्टिमेटम दिला असून, योग्य ती कारवाई न झाल्यास अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

ग्रामस्थांनी प्रमुख चिंता व्यक्त केली आहे की, कंपनीच्या आवारात मोठ्या प्रमाणावर स्फोटके आणि घातक रसायने साठवली जात आहेत. यामुळे परिसरातील नागरिकांचे जीवन धोक्यात आले असून, संभाव्य आपत्ती रोखण्यासाठी प्रशासनाने त्वरित पावले उचलावीत, अशी मागणी त्यांनी केली. जर स्थानिक अधिकाऱ्यांनी योग्य तो प्रतिसाद दिला नाही, तर राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाचा दरवाजा ठोठावण्याची तयारी असल्याचेही ग्रामस्थांनी स्पष्ट केले.

ग्रामस्थांनी यापूर्वीही प्रशासनासमोर आपल्या समस्या मांडल्या होत्या. मात्र, १७ दिवसांपूर्वी सादर केलेल्या निवेदनाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे त्यांनी अधिकाऱ्यांवर टीका केली.

गेल्या २० मार्च रोजी ह्यूजेस प्रिसिजन मॅन्युफॅक्चरिंग कंपनीच्या गनपावडर प्रोपेलेंट स्टोरेज युनिटला लागलेल्या आगीमुळे मोठा स्फोट झाला होता. या दुर्घटनेनंतर उपजिल्हाधिकाऱ्यांनी कंपनीच्या व्यवस्थापनावर निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला होता. मात्र, या घटनेनंतरही कंपनीच्या कार्यप्रणालीत कोणताही बदल न झाल्याने ग्रामस्थ अस्वस्थ आहेत. परिणामी, त्यांनी कंपनीला कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी केली आहे. नाकेरी –बेटतुलच्या सरपंच प्रीतम देऊळकर यांनी निषेधादरम्यान प्रशासनाच्या उदासीनतेबद्दल रोष व्यक्त केला. पंचायतीने वारंवार धोक्यांची जाणीव करून दिली असतानाही, सरकारकडून कोणताही ठोस प्रतिसाद मिळत नाही, असे त्यांनी सांगितले.

स्थानिक आमदार अल्टोन डी'कोस्टा यांनीही सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. कंपनीच्या पाठीशी काही प्रभावशाली व्यक्तींचा हात असल्याचा आम्हाला ठाम संशय आहे. जर येथे साठवलेली रसायने अनधिकृत किंवा भेसळयुक्त असतील, तर ती राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करू शकतात, असे त्यांनी म्हटले. ग्रामस्थांनी असा आरोप केला की, सरकार आणि कंपनी यांच्यात संगनमत असल्यानेच अधिकाऱ्यांकडून योग्य ती कारवाई होत नाही. पावसाळ्यात या कंपनीत साठवलेली घातक रसायने आसपासच्या निवासी भागात मिसळण्याचा धोका आहे, मात्र प्रशासन डोळेझाक करत आहे, असे एका स्थानिक रहिवाशाने निदर्शनात सांगितले.

ग्रामस्थांनी सरकारला आवाहन केले की, या धोकादायक स्थितीकडे गांभीर्याने लक्ष द्यावे आणि कंपनीवर कठोर कारवाई करावी. त्यांनी इशारा दिला की, जर प्रशासनाने लवकरच ठोस उपाययोजना केल्या नाहीत, तर स्थानिक नागरिक मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरून आंदोलन करतील. आम्ही आमच्या हक्कांसाठी आणि सुरक्षेसाठी लढत राहू. जबाबदार अधिकाऱ्यांना आणि कंपनीच्या व्यवस्थापनाला जाब विचारला गेला पाहिजे, असे आंदोलकांनी स्पष्ट केले.